Estd.in 1984

K.D.K. College of Engineering, Nagpur

NBA Accredited - Five programs, Grade A, NAAC Accredited

---

# *सीईटीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना*.

**येत्या १ ऑक्टोबर पासून राज्यभरात अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र यांच्या प्रवेशासाठी जी सामूहिक प्रवेश प्रक्रिया होणार आहे .त्या निमित्ताने अनेक विद्यार्थी व पालकांच्या मनात उपस्थित होणारे काही सर्व सामान्य प्रश्न जसे कि प्रवेश परीक्षेच्या वेळी काय करावे लागेल ,कधी जायचे आहे ? ड्रेस कोड काय आहे. या संदर्भातील काही महत्वाच्या बाबी.**

* **सर्वप्रथम आंपण आपल्या सोबत परीक्षा केंद्रावर कोणते साहित्य जवळ बाळगणे आवश्यक आहे त्या बद्दल माहिती .**

१) परिक्षेवेळी प्रत्येकाने आपल्या सोबत हॉल तिकीट बाळगावे.

२) परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्र परिसरातील झरोक्स सेंटर बंद असतात याची नोंद ठेवावी .

३) हॉल तिकीट सोबत शासनाने दिलेले ओरिजनल फोटो आयडी कार्ड जसे की आधार / पॅन / पासपोर्ट या पैकी कोणतेही एक बरोबर ठेवा.

४) इतर कोणतेही फोटो आयडी कार्ड ग्राह्य धरले जाणार नाही . तसेच झेरॉक्स काढलेले व अटेस्टेड केलेले / मोबाईल वरील कार्ड ग्राह्य धरले जाणार नाही .

५) दिव्यांग विद्यार्थ्याने सोबत त्याचे दिव्यांगांचे प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे . (सिव्हिल सर्जन ने दिलेले)

६) ड्रेसकोड हा फॉर्मल असावा . लांब बाह्यांचा शर्ट / टी शर्ट / कुर्ता चालणार नाही

७) अंगावर कोणताही दागिना परिधान करू नये जसे कि ईअर रिंग / अंगठी / बांगडी / चेन / पैंजण इत्यादी .

८) हॉल तिकिटावर काहीही लिहू नये .

९) पारदर्शक पाण्याची बाटली नेऊ शकता . (रंगीत किंवा अपारदर्शक चालणार नाही.)

१०) ५० मिली सॅनिट्झर बॉटल शक्यतो जेल स्वरूपातील न्या कारण जर चुकून परीक्षा देत असताना जर टेबलावर सांडले गेले तर तुमचा अमूल्य वेळ वाया जाऊ शकते.

११) रिपोर्टींग / एन्ट्री टायमिंगलाच केंद्रावर पोहोचा . त्या नंतर परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जात नाही

१२) सकाळी हलकासा आहार करून जा कारण परीक्षा संपल्याशिवाय तुम्हाला बाहेर पडता येणार नाही . सोबत पाण्या ऐवजी सरबत नेले तर जास्त बरे होईल कारण त्यातील लिंबू व साखरेने तुम्हाला थोडे फ्रेश वाटेल . सोबत थोडे मनुके, बदाम किंवा चॉकलेट्स असू द्या जेणे करून तुम्हाला लगेच भूक लागणार नाही .

१३) सोबत नेलेल्या सॅनिटायझर्स ने आधी आपली बसण्याची जागा, टेबलं तसेच इतर काही वस्तू जवळ असतील ती सॅनिटाइज करून घ्या.

१४) फक्त चप्पल घालून जाणे , सँडल किंवा शूज वर बंदी आहे .

१५) मोबाईल बरोबर नेऊ नये . कारण परीक्षा केंद्रावर मोबाईल ठेवण्याची सोय नाही .

१६) जर तुमच्या शरीराचे तापमान निर्धारित तापमान पेक्षा जास्त असेल तर तुम्हाला वेगळ्या आयसोलेशन कक्षा मध्ये बसावे लागेल . त्यावेळी घाबरून जाऊ नका . शांत पणे परीक्षा द्या .

१७) अस्वस्थ वाटल्यास एक दीर्घ श्वास घ्या व शांत मनाने परिक्षेला सामोरे जा.

१८) प्रत्येक विद्यार्थ्यांच रिपोर्टींग टाइम हा वेगवेगळा आहे . त्या मुळे आपल्या मित्राचा रिपोर्टींग टायमिंग काय आहे यावर आपले जाणे ठरवू नका .

-------------------- **ALL THE BEST** --------------------